RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक १८] शुक्रवार, फेब्रुवारी १२, २०२१/माघ २३, शके १९४२ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**वित्त विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ फेब्रुवारी २०२१.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५.**

क्रमांक व्यकर १२२१/प्र.क्र. ३/कराधान-३. —ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी खात्री झाली आहे की, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर नियम, १९७५ मध्ये तात्काळ सुधारणा करण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे आणि त्यामुळे महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. १६) च्या कलम २७ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकानुसार सदर नियमांना पूर्वप्रसिद्धी देण्याची अट पाळण्याची गरज नाही;

म्हणून, आता, उक्त अधिनियमाच्या कलम २७ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकासह पोट-कलम (१) आणि (२) च्या शक्तींचा वापर करून तसेच यासंदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून, याद्वारे महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर नियम, १९७५ मध्ये, खालील सुधारणा करीत आहे, म्हणजेच :—

१. या नियमांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर (दुसरी सुधारणा) नियम, २०२१ असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर नियम, १९७५ (यापुढे "मुख्य नियम" असे संबोधण्यात येईल) च्या नियम ४अ मध्ये, उप-नियम (१) मध्ये, खालील परंतुक दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :—

"परंतु असे की, जेथे मालक किंवा व्यक्ती अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (३अ) खाली विनिर्दिष्टीत केलेली कंपनी असेल, ती सर्व संचालक आणि प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता यांचे आयकर अधिनियम, १९६१ खालील स्थायी लेखा क्रमांक (पॅन) किंवा कर वजात आणि गोळा करण्याचा लेखा क्रमांक (टॅन) नोंदणी किंवा नांव नोंदणी प्रमाणपत्रासाठीच्या अर्जामध्ये देईल. तथापि, जेथे संचालक किंवा प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता परदेशी नागरिक असेल ज्याचा स्थायी लेखा क्रमांक (पॅन) किंवा कर वजात आणि गोळा करण्याचा लेखा क्रमांक (टॅन) नसेल, तर ते पारपत्र क्रमांक देतील आणि स्थायी लेखा क्रमांक (पॅन) किंवा कर वजात आणि गोळा करण्याचा लेखा क्रमांक (टॅन) मिळताच, कंपनीच्या स्थायी लेखा क्रमांक (पॅन) किंवा कर वजात आणि गोळा करण्याचा लेखा क्रमांक (टॅन) यासह, ते नोंदणी प्राधिकाऱ्याकडे सादर करतील.".

३. मुख्य नियमांच्या नियम ८ वगळण्यात येत आहे.

४. मुख्य नियमांना जोडलेल्या, नमुना १ मध्ये,-

(क) अनु. क्र. १(ब) नंतर खालील दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :—

"१(क) मालकाचा पारपत्र क्रमांक (जर कंपनीचा संचालक किंवा प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता परदेशी नागरिक असेल ज्याने पॅन धारण केलेला नाही)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पारपत्र जारी करणाऱ्या देशाचे नाव. | | | | | | | | | |

";

(ख) अनुसूची-१ मध्ये,-

(एक) अनु. क्र. १ मध्ये, "आयकर क्रमांक" या शब्दांऐवजी "पॅन क्र. किंवा पारपत्र क्र. (जर कंपनीचा संचालक किंवा प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता परदेशी नागरिक असेल ज्याने पॅन धारण केलेला नाही) " हे शब्द आणि कंस दाखल करण्यात येत आहेत;

(दोन) अनु क्र. २ मध्ये, "आयकर क्रमांक" या शब्दांऐवजी "पॅन क्र. किंवा पारपत्र क्र. (जर कंपनीचा संचालक किंवा प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता परदेशी नागरिक असेल ज्याने पॅन धारण केलेला नाही) " हे शब्द आणि कंस दाखल करण्यात येत आहेत.

५. मुख्य नियमांना जोडलेल्या, नमुना २ मध्ये, अनु. क्र. १(ब) नंतर, खालील दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :-

"१(क) अर्जदाराचा पारपत्र क्रमांक (जर कंपनीचा संचालक किंवा प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता परदेशी नागरिक असेल ज्याने पॅन धारण केलेला नाही)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पारपत्र जारी करणाऱ्या देशाचे नाव. | | | | | | | | | |

".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मंदार केळकर,**
शासनाचे उप सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, Dated the 12th February 2021.

*NOTIFICATION*

THE MAHARASHTRA STATE TAX ON PROFESSIONS, TRADES, CALLINGS AND EMPLOYMENTS ACT, 1975.

No. PFT-1221/C.R. 3/Taxation-3.— Whereas the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action further to amend the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Rules, 1975 and to dispense with the condition of previous publication thereof under the proviso to sub-section *(3)* of section 27 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975 (Mah. XVI of 1975).

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections *(1)* and *(2)* read with the proviso to sub-section *(3)* of section 27 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975, and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, makes the following rules further to amend the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Rules, 1975, namely :—

1. These rules may be called the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments (Second Amendment) Rules, 2021.

2. In rule 4A of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Rules, 1975 (hereinafter referred to as "the principal Rules"), in sub-rule (1), the following proviso, shall be added, namely: -

"Provided that, where an employer or a person is a Company specified under sub-section (3A) of section 5 of the Act, apply for certificate of registration or enrolment, shall provide the Permanent Account Number (PAN) or Tax Deduction and Collection Account Number (TAN) under the Income Tax Act, 1961 of all the directors and authorized signatory of the Company. However, where the director or the authorized signatory is a foreign national who does not have Permanent Account Number (PAN) or Tax Deduction and Collection Account Number (TAN), then he shall provide his Passport Number and he shall furnish the Permanent Account Number (PAN) or Tax Deduction and Collection Account Number (TAN) to the registering authority as soon as he obtains it, along with the Permanent Account Number (PAN) or Tax Deduction and Collection Account Number (TAN) of the Company."

3. Rule 8 of the principal Rules shall be deleted.

4. In FORM I, appended to the principal Rules,-

(a) after Sr. No.1(B), the following shall be inserted, namely :-

"1(C) Passport Number of Employer (in case if Director of Company or Authorized signatory is foreign national who does not hold PAN)

<table>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td colspan="5">Name of the country issuing passport.</td><td colspan="5"></td></tr>
</table>

".

(b) in ANNEXURE-I, -

(i) in Sr. No. 1, for the words "PAN No." the words and brackets "PAN No. or PASSPORT No. (in case if Director of Company or Authorized signatory is foreign national who does not hold PAN)" shall be substituted;

(ii) in Sr. No. 2, for the words "PAN No." the words and brackets "PAN No. or PASSPORT No. (in case if Director of Company or Authorized signatory is foreign national who does not hold PAN)" shall be substituted.

5. In FORM II appended to the principal Rules, after Sr. No. 1(B), the following shall be inserted, namely: -

"1(C) Passport Number of Applicant (in case if Director of Company or Authorized signatory is foreign national who does not hold PAN)

<table>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td colspan="5">Name of the country issuing passport.</td><td colspan="5"></td></tr>
</table>

".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MANDAR KELKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.